| | | |
|---|---|---|
| | **वाकड पोलीस ठाणे,**<br>**पोलीस आयुक्तालय, पिंपरी-चिंचवड** | |
| | **प्रेसनोट** दिनांक: १५/०९/२०२४ | |

# सराईत व गंभीर गुन्ह्यातील पाहिजे असलेल्या गुन्हेगारास देशी रिव्हॉल्वर व जिवत काडतुसासह पाठलाग करुन शिताफिने अटक वाकड पोलीस स्टेशन तपास पथकाची कारवाई

---

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे हद्दीत बेकायदेशीर अग्नीशस्त्रे व दारुगोळा बाळगणारे, खरेदी विक्री करणारे त्याद्वारे समाजात दहशत निर्माण करणाऱ्या गुन्हेगारांवर कारवाई करणेबाबत मा. श्री.विनयकुमार चौबे सो, पोलीस आयुक्त, डॉ. शशीकांत महानवर, पोलीस सह आयुक्त, श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांनी आदेशीत केलेले आहे. त्यानुसार परिमंडळ २ चे पोलीस उप आयुक्त, श्री. विशाल गायकवाड, सहायक पोलीस आयुक्त श्री.सुनिल कुराडे यांनी अवैध अग्नीशस्त्रे बाळगणाऱ्या खरेदी विक्री करणाऱ्या गुन्हेगारांवर कारवाई करिता विशेष मोहिम सुरु केली आहे.

श्री.निवृत्ती कोल्हटकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी वाकड पोलीस ठाण्यातील अधिकारी/अंमलदार यांना वाकड पोलीस स्टेशन हद्दीतील बेकायदेशीर अग्निशस्त्र बाळगणा-यांवर कायदेशीर कारवाई करणेबाबत सांगितले आहे.

वाकड पोलीस ठाण्याचे तपास पथकातील पोउपनि.सचिन चव्हाण व अंमलदार असे हद्दीत पेट्रोलींग करीत असताना तापकीरमळा चौक, काळेवाडी पुणे येथे त्यांना वाकड पोलीस स्टेशन गु.रजि.नं.८६१/२०२४ भा.न्या.सं.कलम ११८(१)११५(२), १८९(२), १९१(२),१९१(३),१९०,३५१(२), ३५२ आर्म ॲक्ट ४,२५ महा.पो.का.क.३७(१)(३) सह १३५, क्रि.लॉ. अमेंडमेंट कलम ३,७ अन्व्ये दाखल गुन्हयातील पाहीजे आरोपी नामे **विजय राहुल तलवारे, वय २२ वर्षे, रा. सार्थक बलकवडे यांची खोली, मोरया कॉलनी, तापकीर चौक, काळेवाडी, पुणे** हा तेथे दिसला. तो गंभीर गुन्ह्यातील पाहिजे आरोपी असल्याने त्यास थांबविण्याचा प्रयत्न केला असता तो पळुन जावु लागलेने त्याचा पाठलाग करुन काही अंतरावर त्यास पकडले. त्याची अंगझडती घेतली असता त्याचे पॅण्टमध्ये समोरच्या बाजूस एक देशी बनावटीचे रिव्हॉलव्हर व एक जिवंत राऊंड मिळुन आले.

सदर घटनेबाबत वाकड पोलीस स्टेशन गु.रजि.नं.१००८/२०२४ भारताचा शस्त्र अधिनियम १९५९ चेकलम ३,२५ महाराष्ट्र पोलीस अधिनियम ३७(१)(३) सह १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला असून नमूद गुन्ह्यात त्यास अटक करण्यात आली. आरोपीने सदरचे रिव्हॉलव्हर व राऊंड कशासाठी आणलेले होते याबाबत अधिक तपास चालू आहे.

आरोपी विजय राहुल तलवारे याची गुन्हेगारी पार्श्वभुमी खालिलप्रमाणे.

| अ.क्र. | गु.र.नं. | अधिनियम व कलम |
|---|---|---|
| १. | १२२६/२०१८ | भादंवि कलम ३०७,३२६,३२३,५०४,५०६,३४ |
| २. | १२७/२०२० | भादंवि कलम ३०७,३४१,५०६(२),४२७,१४१,१४३,१४४,१४८,१४९, क्रि.लॉ.अ.ॲ. ३,७ |
| ३. | ७३५/२०२० | म.जु.अ.कलम ४,५ भादंवि कलम १८८, २६९, |
| ४. | ४६/२०२१ | भादविक ३९५, ५०६(२), ५०४,४२७ आर्म ॲक्ट ४,२५ सह मपोकाक.३७(१)(३) |

| | | |
|---|---|---|
| | | सह १३५ क्रि.लॉ.अ.ॲ. ३,७ |
| ५ | १५४/२०२१ | भादविक ३०७,३२४,३४ मपोकाक.३७(१)(३) सह १३५ मोक्का कायदा |
| ६ | ६९२/२०२२ | भादविक ३९५,३८७,४२७,५०४,५०६, मपोकाक.३७(१)(३) सह १३५ मोक्का कायदा |
| ७ | १२२७/२०२३ | भादविक ३९५, ५०४,५०६(२), आर्म ॲक्ट ४(२५) मपोकाक.३७(१)(३) सह १३५ क्रि.लॉ.अ.क.३,७ |
| ८ | ८६१/२०२४ | भा.न्या.सं.कलम ११८(१)११५(२), १८९(२), १९१(२),१९१(३),१९०,३५१(२), ३५२ आर्म ॲक्ट ४,२५ महा.पो.का.क.३७(१)(३) सह १३५, क्रि.लॉ. अमेंडमेंट कलम ३,७ |

सदरची उल्लेखनीय कामगीरी मा.श्री.विनयकुमार चौबे सो, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा.श्री.शशिकांत महावरकर सो, पोलीस सह आयुक्त, मा. श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त, मा. श्री. विशाल गायकवाड सो, पोलीस उप आयुक्त, परि-२, पिंपरी चिंचवड, मा. श्री. सुनिल कुराडे, सहा. पोलीस आयुक्त सो, वाकड विभाग, पिंपरी चिंचवड यांचे मार्गदर्शना खाली वाकड पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक निवृत्ती कोल्हटकर, पोउपनि.सचिन चव्हाण, पोउपनि.अनिरुध्द सावर्डे, श्रेणी पोउपनि.बिभीषण कन्हेरकर, श्रेणीपोउपनि.राजेंद्र काळे, पोलीस अंमलदार वंदु गिरे, संदिप गवारी, स्वप्निल खेतले, अतिश जाधव, प्रमोद कदम, अतिक शेख, प्रशांत गिलबीले, रामचंद्र तळपे, कौतेंय खराडे, अजय फल्ले, भास्कर भारती, रमेश खेडकर, ज्ञानदेव झेंडे, सौदागर लामतुरे, मंगेश लोखंडे (परि-२) यांनी केलेली आहे.

**(विशाल गायकवाड)**
पोलीस उपआयुक्त,
परिमंडळ-२, पिंपरी चिंचवड